# सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
## राष्ट्रीय सेवा योजना
## वार्षिक अहवाल
## 2022-2023

शैक्षणिक सत्र २०२२—२३ च्या सुरूवातीला राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये सहभागी होऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींची नामांकन प्रक्रीया पूर्ण करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कार्य करण्याची आवड निर्माण व्हावी. श्रमदानाची भावना जोपासावी, सेवाभाव निर्माण व्हावा, श्रमाची प्रतिष्ठा निर्माण व्हावी तसेच ग्रामीण जीवनाशी त्यांचा परिचय होऊन त्यांना राष्ट्रीय सेवा योजने बद्दलची माहिती अशा विविध पैलुंशी स्वयंसेवकांना परिचित करण्यात आले. विविध माध्यमाद्वारे त्यांना याबाबत प्रेरणा देण्यात आली.

### दि. 5 जून 2022 आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिन

सरदार पटेल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिनाच्या आयोजन दि. ५ जून २०२२ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी जगभर ५ जून रोजी साजरा केला जातो आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांचे प्रमुख साधन आहे. सागरी प्रदूषण, जास्त लोकसंख्या, ग्लोबल वॉर्मिंग, शाश्वत उपभाग आणि वन्यजीव गुन्हेगारी या सारख्या पर्यावारणीय समस्यांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी एक व्यासपीठ आहे. जागतिक पर्यावरण दिन हा सार्वजनिक पोहोचण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ आहे, ज्यामध्ये जदवर्षी १४३ हून अधिक देशांचा सहभाग असतो. दरवर्षी, कार्यक्रमाने

व्यवसाय, गैर सरकारी संस्थ, समुदाय, सरकार आणि ख्यातनाम व्यक्तींना पर्यावरणीय कारणांच समर्थन करण्यासाठी एक थीम आणि मंच प्रदान केला आहे.

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी या दिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पर्यावरण दिवस या दिवशी त्या गोष्टी बद्दल जागरूक केले जाते. ज्यांचा जगावर आणि पर्यावरणावर सकारत्क आणि नकारात्मक परिणाम होतात. हा दिवस पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या जबाबदारीचे आपल्याला जाणीव आणि द्रष्टीकोन देतो असे स्वयंसेवकांना संबोधन केले.

## दि. 21 जून 2022 आंतरराष्ट्रीय योग दिवस

सरदार पटेल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय छात्र सेना (मुले व मुली) यांच्या संयुक्त विद्यमाने ८ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस दि. २१ जून २०२२ रोजी सकाळी ठीक ७.०० वा. स्व. श्री शांताराम पोटदुखे सभागृहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रामुख्यने व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर, योग प्रशिक्षक व मार्गदर्शक श्री कैलास घुमडे, प्रमुख पाहूणे म्हणून उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, एन.सी.सी. चे प्रमुख कॅप्टन डॉ. सतिश कन्नाके, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदीप आर. गोंड प्रामुख्याने उपस्थिती होते. अध्यक्षीय भाषणांत मनोगत व्यक्त करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर म्हणाले की निरोगी तन आणि शांत मन यांची गुरूकिल्ली म्हणजे योग. आजच्या आधुनिक युगात, व्यग्रतेमध्येही योगासने निरोगी ठेवण्यास मदत करते. सर्व शारीरिक आणि मानसिक आजारांना शरीरापासून दूर ठेवण्याबरोबर योगाचा प्रत्येकाच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडतो. रोज योगासने केल्याने शारीरिक आणि मानसिक उर्जेच्या विकासासोबत तणाव आणि नैराश्यही कमी होते. शरीर निरोगी आणि मन शांत ठेवण्यासाठी जगभरातील बहुतेक लोक योगाचा अवलंब करतात. जगभरात ८ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करीत आहोत. योगा

केल्याने केवळ स्वत:ला तंदुरूस्त ठेवता येत नाही तर आरोग्यालाही अनेक समस्यांपासून दूर ठेवता येते. योग निसर्गाजवळ नेतो, योग ईश्वराची अनुभूती देतो. योगाचे खूप फायदे आहेत. योगामुळे साखर, बद्धकोष्ठता यांसारख्या आजारांशी लढण्यासही मदत होते. मन शांती आणि उत्तम आरोग्यासाठी योग आणि ध्यान आवश्यक मानले जाते. योग प्रशिक्षक व मार्गदर्शक श्री कैलास घुमडे यांनी योगाचे महत्व सांगुन कुणाल कायरकर, रितेश चौधरी, कुणाल चहारे यांच्या सोबत प्रात्यक्षिकांद्वारे उपस्थितांना विविध आसनांसोबत मार्गदर्शन केले. श्री कैलास घुमडे मार्गदर्शन करतांना म्हणाले की दररोज योगा केल्याने तुमच्या शरीरावर सकारात्मक परिणाम होतो. यामध्ये महाविद्यालयाचे प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयोचे स्वयंसेवक, खेळांडू, एन.सी.सी. चे कॅडेटस यांनी उभ्या, बैठक, पाठीवरील ताडासन, वज्रासन, शवासन, प्राणायामातील, कपालभाती, अनुलोम–विलोम, भ्रामरी, ध्यान आदी योगासनांचे प्रकार केले. ध्यानधारणेपासून मनुष्य जीवनाचे रहस्य, उद्देश जाणून घेता येतो अशी शिकवण यावेळी देण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयोचे स्वयंसेवक, खेळांडू, एनसीसीचे कॅडेट मोठया संख्येने उपस्थित होते.

## दि. 1 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2022 स्वच्छता पंधरवाडा

स्वच्छता पंधरवाडा कार्यक्रमा अंतर्गत महाविद्यालयाच्या रासेयो विभागाकडून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दि. १ ऑगस्ट २०२२ ला स्वच्छता पखवाडा कार्यक्रमा अंतर्गत रासेयोचे स्वयंसेवकांनी महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर स्वच्छ केला. दि. ५ ऑगस्ट २०२२ ला स्वच्छता पखवाडा कार्यक्रमा अंतर्गत रासेयोचे स्वयंसेकांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. दि. ९ ऑगस्ट २०२२ ला चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. दि. १२ ऑगस्ट २०२२ ला रासेयो पथकाने घेतलेले दत्तक गाव विसापूर येथे कार्यक्रम अधिकारी व ७५ स्वयंसेवकांनी ग्रामवासियान सोबत ग्रामस्वच्छता अभियान राबविले. दि. १४ ऑगस्ट २०२२ ला महाविद्यालय परिसर स्वच्छता करण्यात आली. यामध्ये सर्व स्वयंसेवाकांनी

उत्सफुर्तपणे सहभाग घेतला आणि स्वातंत्र्य दिनाचे निमित्त साधून सर्व परिसर येणाऱ्या १५ ऑगस्ट करीता स्वच्छ केले. दि. १५ ऑगस्ट २०२२ ला ध्वजारोहण कार्यक्रमानंतर स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील पूर्ण परिसर स्वच्छ केले.

## दि. 13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2022 हर घर तिरंगा अभियान

दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी भारताचा ७५ वा स्वातंत्र्यदिन आहे. यानिमित्ताने देशभरात केंद्र सरकारच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव हा उपक्रम राबवण्यात येत आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत देशभरात वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने सरकारतर्फे हर घर तिनंगा अभियान राबवण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट असे तीन दिवस सर्वांना आपल्या घरांवर राष्ट्रध्वज फउकवण्याचे आवाहन पंतप्रधान श्री नरेन्द्र मोदी यांनी देशातील जनतेला केले. म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयोच्या स्वंयसेवक तसेच विद्यार्थ्यांना तिरंगा देऊन सर्वांना आपल्या घरी तीन दिवस तिरंगा लावायचे असे संबोधित केले.

## <u>दि. 18 ऑगस्ट 2019 वृक्ष रक्षाबंधन</u>

शहरात लोहरा मामला जंगलातील वृक्षांना राखी बांधून वृक्ष रक्षाबंधन कार्यक्रम साजरा झाला. महाविद्यालयीन रासेयोचे स्वयंसेवक सहभागी होत पर्यावरण रक्षणासाठी सदैव तत्पर असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. अदानी गो बॅक या आंदोलनात लोहारा मामला जंगलात प्रस्तावित कोळसा खान विरोधात पर्यावरणवादी संस्थासह अनेक संस्था संघटना व चंद्रपुरकर जनता एकजुट झाली होती. यामुळेच या जंगलाचे रक्षण झाले. या आंदोलनाच्या स्मृती जीवंत राहाव्या आणि नव्या पिढीसमोर निसर्गाचा हा प्रेरणादायी लढा कायम ठेवण्यास दरवर्षी इको—प्रोच्या वतीने लोहारा मामला जंगलातील वृक्षांना राखी बांधून वृक्ष रक्षाबंधन कार्यक्रम साजरा केला जातो.

## दि. 18 सप्टेंबर 2022 ला महाविद्यालय व परिसर स्वच्छता

दि. १८ सप्टेंबर २०२२ रोजी स्वच्छता अभियानअंर्तगत महाविद्यालयाचे संपूण परिसर स्वच्छ करण्यात आले. या स्वच्छता अभियानात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर, प्राध्यापक, शिक्षकेत्तर करर्मचारी, रासेयोचे स्वयंसेवक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## दि. 19 सप्टेंबर 2022 ला महाविद्यालय व परिसर स्वच्छता

दि. १९ सप्टेंबर २०२२ रोजी चंद्रपूर महानगरपालीक, इको—प्रो आणि सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने एतिहासिक गोंड राजा किल्याची स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता अभियानात महानगरपालीकेचे कर्मचारी, इको—प्रो संस्थेचे सदस्य, महाविद्यालयातील रासेयोचे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

## दि. 23 सप्टेंबर 2022 रक्तदान शिबिर

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्व. शांतारामजी पोटदुखे यांच्या पुण्यस्मरणाप्रीत्यर्थ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन दि. २३ सप्टेंबर २०२२ ला करण्यात आले. शासकीय रूग्नालय चंद्रपूरच्या सौजन्याने हे रक्तदान शिबिर श्री शांतारामजी पोटदुखे सभागृहामध्ये आयोजित करण्यात आले. या रक्तदान शिबिरात रासेयोचे स्वयंसेवक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्सफुर्तपणे सहभाग घेतला व ७२ रक्तदात्यांनी रक्तदान करून आदर्श निर्माण केला. या भव्य रक्तदान शिबिरात सर्वोदय शिक्षण मंडळाचे समस्त पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

## दि. 24 सप्टेंबर 2022 राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस

राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसचा आयोजन दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी करण्यात आले या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर,

प्रमुख अतिथी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, डॉ. पुरूषोत्तम माहोरे, डॉ. वंदना खनके, डॉ. राजकुमार बिरादार, डॉ. निखिल देशमुख व स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर मार्गदर्शन करतांना म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजना ही सामाजिक क्षेत्रात स्वयंसेवकांना कार्य करण्याचे बळ देते व यांनी रासेयोची स्थापने पासून तर आतापर्यंतच्या विकासाचा अहवाल आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केला आणि रासेयोचे स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेची शपथ दिली.

## दि. 02 ऑक्टोंबर 2022 राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती

दि. २ ऑक्टोंबर २०२२ ला राष्ट्रपिता महात्मा गांधीजी आणि पंतप्रधान लालबहादूर शस्त्रीजी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला माल्यर्पण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी रासेयोचे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थिती होते.

## दि. 02 ऑक्टोंबर 2022 माता महाकाली स्वच्छता शांती यात्र

घरासमोर घाण नसावी हे प्रत्येकाला वाटते. पण दुसऱ्याच्या घरासमोर किंवा परिसरात आपण घाण पसरवतो याचा विसर पडतांना दिसते. स्वच्छता मोहिम हि सार्वजनिक व्हावी व प्रत्येकाने जबाबदारी समजून या मोहिमेत सहभाग घ्यावा म्हणून दि. २ ऑक्टोंबर २०२२ रोजी सांयकाळी ५.०० वा. माता महाकाली मंदिरातून स्वच्छता शांती यात्रा काढण्यात आली. या स्वच्छता शांती यात्रेत महाविद्यालयातील रासेयोचे स्वंयसेवक मोठया संख्येने सहभागी होऊन स्वच्छ भारत सुंदर भारत चा संदेश दिला.

## दि. 31 ऑक्टोंबर 2022 लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल जयंती

दि. ३१ ऑक्टोंबर २०२१ रोजी लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला माल्यर्पण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर, उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी रासेयोचे स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थिती होते.

## दि. 29 ऑक्टोबर 2022 स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ऐतिहासिक गोंड राजवंशकालीन किल्याची स्वच्छता

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग, शारीरिक शिक्षण व क्रिडा विभाग आणि इको—प्रो संस्था चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृत महोत्सव वर्ष निमित्त स्वच्छ भारत अभियान अंतर्गत रविवार दि. २९ ऑक्टोबर २०२२ ला ऐतिहासिक गोंड राजवंशकालीन किल्ला स्वच्छता अभियान कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आले. या स्वच्छता कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेटटीवार, इको—प्रो संस्थाचे संस्थापक श्री बंडूजी धोत्रे, राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, डॉ. पुरूषोत्तम माहोरे, डॉ. निखील देशमुख, डॉ. वंदना खनके, इको—प्रो संस्थाचे सदस्य, रासेयोचे स्वयंसेवक मोठया संख्याने उपस्थित होते. या स्वच्छता अभियान प्रसंगी महाविद्यालयचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेटटीवार आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की आजच्या या काळात स्वच्छतेचे महत्व आपण जाणून घेतले पाहिजे व समाजाला पण त्याचा संदेश दिला पाहिजे. तसेच इको—प्रो संस्थेचे संस्थापक श्री बंडूजी धोत्रे मार्गदर्शन करतांना म्हणाले की गोंड राजा किल्ला १५ व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या दरम्यान आणि १६ व्या शतकाच्या सुरूवातीला गोंड राजांनी बांधला होता या किल्याचे जतन करण्याची जबाबदारी आपली आहे असे प्रतिपादन केले. या स्वच्छता अभियानात महाविद्यालयाचे रासेयोचे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक आणि खेळाडूंनी बगड खिडकी जवळ ऐतिहासिक गोंड राजवंशकालीन किल्याची स्वच्छता केली आणि लोकांना स्वच्छतेप्रती जनजागृती केली. या स्वच्छता कार्यक्रमात महाविद्यालयातील स्वंयसेवक व खेळाडूंनी मोठया संख्येने सहभाग घेतला.

## दि. 26 नोव्हेंबर 2022 संविधान दिन

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने संविधान दिन आयोजित करण्यात आला. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला माल्यार्पन करून सामुहिकरित्या संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर यांनी भारतासाठी सर्वश्रेष्ठ असणाऱ्या संविधान निर्मितीतील डॉ. आंबेडकरांच्या कार्याबद्दल त्याचे आभार व्यक्त केले.

## दि. 27 जानेवारी ते 2 फेब्रुवारी 2023 महाविद्यालयीन विशेष शिबिर, विसापूर

सरदार पटेल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथक द्वारा सात दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरा द्वारे विद्यार्थ्यांच्या प्रगती सोबतच त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व विद्यार्थी सामाजिक, आर्थिक, शारीरिक व मानसिकरीत्या सक्षम व्हावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय कार्याविषयी आवड निर्माण व्हावी व श्रमप्रतिष्ठा वाढीस लागावी आणि विद्यार्थी कोरोना महामारी बाबत समाजात जागरूकता निर्माण करतील इत्यादी उददेश समोर ठेऊन महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ दरम्यान विसापूर गावात **"ग्रामविकासाकरीता युवाशक्ती"** या विषयावर महाविद्यालयीन विशेष शिबिर आयोजित करण्यात आले.

## शुक्रवार दि. 27 जानेवारी 2023

राष्ट्रीय सेवा योजनाचे १०० स्वयंसेवक व सर्व कार्यक्रम अधिकारी यांचे ग्रामपंचायत विसापूर येथे सकाळी १०.०० वा. शिबिरस्थळी आगमण, शिबिरस्थळी स्वयंसेवकांची नोंदणी करून परिसार स्वच्छता करण्यात आली.

## शनिवार दि. 28 जानेवारी 2023 शिबिराचे उद्घाटन सोहळा

राष्ट्रीय सेवा योजना पथक द्वारा **“ग्रामविकासाकरीता युवाशक्ती”** या विषयावर महाविद्यालयीन विशेष शिबिराचे उद्घाटन शनिवार दि. २८ जानेवारी २०२३ रोजी सायंकाळी ४.०० वा. राष्ट्रीय शारीरिक शिक्षण महाविद्यालय, विसापूर येथे झाले. या उद्घाटन शिबिराचे अध्यक्ष माजी आमदार तथा सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष श्री सुदर्शन निमकर यांचे शुभहस्ते महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा ध्वजारोहन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. उदघाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना म्हणाले की सामाजिक कार्य करतांना अपाले पद, वय, शिक्षण याचे  काहीही बंधन नसते. महाविद्यालयीन जीवनात समाजसेवा करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे एक चांगले व्यासपीठ आहे. युवकांचे प्रभावी व्यक्तिमत्व घडविण्याचे कार्य शिक्षण क्षेत्राद्वारे होत असते. प्रभावी व्यक्तिमत्व घडवत असताना तरूणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे. तरूणांमध्ये समाजसेवेची जाण झाल्यानंतर तयाचाच पुढचा टप्पा म्हणजे राष्ट्रसेवा होय.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर उद्घाटनीय भाषणात म्हणाले की, आपल्या आयुष्यामध्ये बऱ्याच संधी येत असतात आणि त्या संधीचं सोनं कसं करायचं हे तुम्हालाच ठरवायचं असतं, कारण महाविद्यालयामध्ये चार भिंतीच्या आत शिक्षण घेत असताना गोंडवाना विद्यापीठांनी जो काही अभ्यासक्र ठरवून दिला त्याच्यानुसार आपण अभ्यास करता असतो, परीक्षा देतो, पास होतो, मी बरेचदा असे म्हणतो की, परीक्षेमध्ये मेरिट येणं हे महत्वाचे आहे परंतु त्याच्यानंतर आपलं चांगलं करिअर करणार आपल्यामध्ये असलेल्या नेतृत्वगुणांचा विकास करणार याची संधी महाविद्यालयाच्या वतीने वेगवेगळया उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही देत असतो. आणि राष्ट्रीय सेवा योजना हे असं प्लॅटफॉर्म आहे की, ज्यामध्ये तुमच्या मध्ये असलेल्या नेतृत्वगुणांचा विकास करण्याची एक संधी या शिबिराच्या माध्यमातून तूमच्या समोर आहे.

या प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार तथा सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष श्री सुदर्शन निमकर, उद्‌घाटक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर, प्रमुख अतिथी डॉ. विजया गेडाम जिल्हा समन्वयक, रासेयो, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, प्रमुख अतिथी सौ. वर्षाताई मछिन्द्र कुळमेथे सरपंच, ग्रामपंचायत, विसापूर, उपसरपंच मा. श्री अनेकश्वर रघुनाथ मेश्राम महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेटटीवार, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदिप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, डॉ. पुरूषोत्तम माहोरे, डॉ. राजकुमार बिरादार, डॉ. निखील देशमुख, डॉ. वंदना खनके उपस्थित होते. या शिबिराकरीता महाविद्यालयातील १०० स्वंयसेवकांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे संचालन डॉ. कुलदिप आर. गोंड यांनी केले तर आभार प्रदर्शन  डॉ. निखील देशमुख यांनी केले

## रविवार दि. 29 जानेवारी 2023

शिबिरार्थ्यांकडून श्रमदानातून विसापूर गावात ग्राम स्वच्छता अभियानात गावाची स्वच्छता करण्यात आली.

दुपारच्या प्रथम सत्रात २.०० ते ३.०० वा. वक्ते म्हणून डॉ. वैभव मेहता Data Scientist and Researcher Indian Ambacy Japan, यांनी **“संवाद आणि वक्तृत्व कोशल्यातून व्यक्तिमत्व विकास”** या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होऊन त्यांची समाजाबाबत असणारी जबाबदारी वाढते. देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी विद्यार्थ्यांनी निष्ठेने कार्य करावे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी त्यांच्यातील कौशल्याचा विकास होण आवश्यक आहे असे मार्गदर्शन केले.

दुपारच्या प्रथम सत्रात प्रबोधनपर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. दुपारी ३.०० ते ४.०० वा. वक्ते म्हणून चंद्रपूरचे उपप्रादेशिक परिवहन अधिकरी श्री किरण मोरे, चंद्रपूर वाहतुक शाखाचे पोलिस निरिक्षक श्री सुधीर जाधव यांनी **“रस्ता सुरक्षा व वाहतुकीचे नियम”** या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन करतांना श्री किरण मोरे

यांनी म्हणाले की , दिवसेदिवस वाहनांची संख्या वाढतच असून अपघातांचेही प्रमाण वाढले आहे. अपघात टाळण्यासाठी प्रत्योकने रस्ता सुरक्षा नियमांचे पालन तंतोतंत करणे गरजेचे आहे. रस्त्यावर होणारे अपघाताचे प्रमाण लक्षात घेता रस्ता सुरक्षा व वाहतूकीचे नियम प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात बिंबविणे आवश्यक आहे. चालवताना मोबाईलचा वापन न करणे , ड्रिंक्स अॅड ड्राईव्ह करूण गाडी चालवू नये, अति वेगाने गाडी चालवू नये अश्या अनेक विषयांवन मार्गदर्शन केले. श्री सुधीर जाधव पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा चंद्रपूर यांनीही स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात ४.०० ते ५.०० वा. वक्ते चंद्रपूर सायबर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री रोशन इरपाचे तथा सायबर हाईजिन प्रॅक्टीशनर श्री. मुजावर अली यांनी **“सायबर सुरक्षा”** या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की सायबर गुन्हयांत माहितीची चोरी इ—मेलच्या माध्यमातून अपशब्द पाठवणे, माहितीचा अवैध वापर, माहितीत सहेतूक फेरफार, ठरवलेली सेवा देण्यास नकार असे अनेक प्रकार आहेत. तसेच मोबाइल नेटसारख्या क्राइम व इंटरनेट बॅकिंग यासारख्या गुन्हयाचे प्रकार भारतात सर्वाधिक आहे. तसेच काही लोक सायबर सुरक्षेविषयी फारवे जागरूक नाहीत केवळ इंटरनेट असेल, तरच गुन्हे घडू शकतात. दिवसेदिवस वाढता संगणक व इंटरनेटचा वापर आणि त्या अनुषंगाने सायबर गुन्हायांमध्ये होणारी वाढ ही अतिशय चिंताजनक बाब असून, या गुन्हयांना शहरातील तरूणांबरोबरच प्रौढ व्यक्तीदेखील कळत न कळत बळी पडत आहेत. आपण सायबर गुन्हायंचे लक्ष्या होऊ नये, म्हणून अधिकाधिक सतर्कता बाळगणे हाच यावरील मुख्य उपाय असल्याचे मत मुतावर अली यांनी केले.

## सोमवार दि. 30 जानेवारी 2023

राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम अधिकारी व शिबिरार्थ्यांनी विसापूर गावकाऱ्यासोबत मिळून **वर्धा नदिवर श्रमदानातून बंधारा बांधून** गावाच्या लोकांसाठी उन्हाळयात होणाऱ्या पाण्याची समस्याची उपाययोजना करून दिली.

दुपारच्या प्रथम सत्रात ३.०० ते ४.०० वा. वक्ते म्हणून विसापूर प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकिय अधिकारी डॉ. अविशा मडावी यांनी **“आरोग्य तपासणी शिबिर”** या कार्यक्रमात स्व. शांताराम पोटदुखे यांच्या जयंतीतिमित्त शिबिरात बीपी, शुगर, ताप, मलेरिया, थायराईट, सीबीसीची तपासणी ५२ लोकांनी केली तसेच **“मोबाईल व अपुरी झोप विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करते”** या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना डॉ. अविशा मडावी म्हणाले मोबाईल ही अशी वस्तू झाली आहे, जिच्याशिवाय आता कोणीच राहू शकत नाही. मोबाईल दिसला नाही की खूप जणांची चिचिड होऊ लागते. पूर्वी मोबाईल हा फक्त मोठया माणसांसाठी कामाची अशी वस्तू होती. पण आता ती अगदी लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सगळयांसाठीच जीवनावश्यक वस्तू बनून गेली आहे. लहान मुलांच्या हातातही हल्ली मोबाईल फोन दिसू लागला. खूप जणांना फोन नसेल तर झोप लागत नाही. फोन हातात असेल मगच झोपावेसे वाठते. फोनच्या खूप जास्त  अधील गेल्यामुळे एकटेपणा, निद्रानाश, कामात लक्ष न लागणे, पैसे वाया जाणे, सायबर क्राईमचा धोका, डोळयांच्या समस्येचा त्रास तुम्हालाा होऊ शकतो असे संबोधन केले.

दुसऱ्या सत्रात ४.०० ते ५.०० वा. वक्ते म्हणून चंद्रपूर जलबिरादरीचे जिल्हा समन्वयक श्री संजय वैद्ययांनी **“जल संवर्धन”** या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की पर्यावरणाच्या रक्षणासाठी अनेक प्रकारचे प्रकल्प सुचवले जातात. कोणीतरी आपल्या गच्चीवर बाग करतो. मात्र, वृक्षांची लागवड व जोपासना करणे हे सर्वांचे  कर्तव्य आहे. दैनंदिन जीवनातील लहान लहान सवयी बदलल्या तर पर्यावरणास  मोठा हातभार लागू शकतो. पाण्याचा काटकसरीने वापन करण्से तसेच नद्या व तलावातील प्रदूषण थांबविणे पर्यावरणासाठी हितारक ठरते. पाण्याचा पुनर्वापर, रेनवॉटन हार्वेस्टिंग पारंपरिक जलस्त्रोतांचे नूतनीकरण व अन्य अनुषंगिक माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम करावे. जलसंधारणातील एक धोरण म्हणजे रेन वॉटन हार्वेस्टिंग. तलाव, कालवे खोदणे, पाणी साठयाचा विस्तार करणे आणि पावसाचे पाणी पकडणारे नलिका आणि घरावर गाळण्याची यंत्रणा बसवणे हे पावसाचे पाणी साठवण्याच्या वेगवेगळया पद्धती आहेत. कापणी केलेले आणि फिल्टर केलेले

पावसाचे पाणी शौचालये, घरगुती बागकाम, लॉन सिंचन आणि लहान प्रमाणात शेतीसाठी वापरले जाऊ शकते.

## मंगळवार दि. 31 जानेवारी 2023

मातोश्री वृद्धाश्रमाला भेट देऊन शिबिरार्थ्यांनी वृद्धाश्रमाच्या संपूर्ण परीसराची स्वच्छता, नाली सफाई, खोल्या, बरामदा, बाहेरच्या मैदानाची, बगीच्यातील संपूर्ण परिसर स्वच्छ करून दिला. व तिथे राहणाऱ्या वृद्धांसोबत हितगुज केले आणि त्यांच्या समस्या समजून घेतल्या आणि त्यांच्या सोबत मिळून भजन व नृत्य केले. आपल्या आप्तांना वृद्धाश्रमात पाठविणार नाही अशी शिबिरार्थ्यांनी शपथ घेऊन ओल्या डोळयांनी वृद्धांना निरोप दिला. व सर्व शिबिरार्थी व कार्यक्रम अधिकाऱ्यांनी तिथे राहणाऱ्या वृद्धानां फळ वाटप करून आशीर्वाद घेतला.

दुपारच्या प्रथम सत्रात ३.०० ते ४.०० वा. वक्ते म्हणून श्री शैलेश भगत कौशल्य विकास अधिकारी, चंद्रपूर यांनी **"रोजगार, स्वयंरोजगा, करिअर मार्गदर्शन"** या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना म्हणाले की आपली आवड ओळखून करिअरची निवड करा. त्यासाठी प्रचंड मेहनत करा. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी झोकून देऊन काम करणं आवश्यक असतं. त्यादिशेने जिददीने वाटचाल करा, असा मूलमंत्र दिला.

दुसऱ्या सत्रात ४.०० ते ५.०० वा. वक्ते म्हणून चंद्रपूर अनुलोम संस्थाचे जिल्हा समन्वयक श्री राहुल ताकधट यांनी **"शासकीय योजनेची माहिती"** या विषयावर शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की आयुष्यमान भारत, प्रधान आवास योजना, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, अंतरजातीय विवाह योजना, अपंग विवाह योजना, हलके व जड वाहन प्रशिक्षण, संगणक प्रशिक्षण, शिलाई मशिन देणे, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना, बांधकाम कामगार योजना, गाळमुक्त धरण गाळमुक्त शिवार इत्यादि योजनेची माहिती दिली.

## बुधवार दि. 1 फेब्रुवारी 2023 शिबिराचे समारोपीय कार्यक्रम

शिबिरार्थ्यांकडून श्रमदानातून विसापूर गावात ग्राम स्वच्छता अभियानात गावाची स्वच्छता करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे "ग्रामविकासाकरीता युवाशक्ती" या विषयावर आधारीत महाविद्यालयीन विशेष शिबिर दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. दि. १ फेब्रुवारी २०२३ रोजी सांयकाळी ५.०० वा. या शिबिराचा समारोपीय कार्यक्रम घेण्यात आला. या शिबिरात १०२ स्वयंसेवकांनी भाग घेतला.

या समारोपीय समारंभाचे अध्यक्ष सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद काटकर, प्रमुख अतिथी जनता महाविद्यालय, चंद्रपूरचे प्राचार्य डॉ. सुभाष मेकाला, शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय चंद्रपूरचे प्रभारी प्राचार्य डॉ. एजाज शेख, राष्ट्रीय शारिरीक शिक्षण महाविद्यालय, विसापूरचे प्राध्यापीका शालीनी आंबटकर, विसापूरचे उपसरपंच श्री अनेकश्वर मेश्राम, शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय चंद्रपूरचे संचालक डॉ. सरोजकुमार दत्ता, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदिप आर. गोंड, विभागी समनव्यक डॉ. उषा खंडाळे, डॉ. वंदना खनके, डॉ. पुरूषोत्तम माहोरे, डॉ. निखिल देशमुख हे व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रमोद एम. काटकर म्हणाले की, अलीकडच्या काळात समाजात वेगवेगळया विचित्र घटना घडताना आपण पाहत आहोत. अशा परिस्थितीत आजचा तरूण कुठे तरी भरकटत जाऊ नये म्हणून राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमातून समाजपरिवर्तन करण्याचे ाकर्य आज राष्ट्रीय सेवा योजनेचा तरूण करीता आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय, उदिदष्टे, ब्रीदवाक्य व बोधचिन्हे या उपक्रमाचे स्वरूप आणि कार्य स्पष्ट करतात. स्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही, मूल्यशिक्षण हे सर्व स्वयंसेवकांमध्ये रूजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे. समाजात सामाजिक जाण देणारा, जनजागृती करणारा, तसेच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे.

यावेळी स्वयंसेवकांना जनता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष मेकाला उपसरपंच श्री अनकेश्वर मेश्राम, डॉ. स्वप्निल माधमशेटटीवार, प्रा. शालीनी जयस्वाल यांनी आपल्या भाषणातून स्वयंसेवकांना मोलाचे मार्गदर्शन केले तर साहील गायकवाड, कु. प्रांजली बोढाले या स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन करतांना डॉ. वंदना खनके म्हणाले की, या शिबिरात रस्ता सुरक्षा व वाहतूकीचे नियम, सायबर सुरक्षा, आरोग्य तपासणी शिबिर, जल संवर्धन, रोजगार, स्वंयरोजगार व करिअर मार्गदर्शन, शासकीय योजनेची माहिती या विषयावर वक्त्यांनी आपल्या भाषणातून स्वयंसेवकांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच गावात मतदान व स्वच्छतेवर जनजागृती करण्यात आली. तसेच विद्यापीठ आपल्या दारी या उपक्रमांतर्गत गावातील युवक शिक्षणापासून

वंचित असेल त्या युवकांना पुढील शिक्षणासाठी संधी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले. स्वयंसेवकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक व जनजागृती कार्यक्रम  आयोजित करण्यात आले होते.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदीप आर. गोंड, डॉ. उषा खंडाळे, डॉ. पुरूषोत्तम माहोरे, डॉ. वंदना खनके, डॉ. निखिल देशमुख, श्री दशरथ कामतवार, श्री अनिल परशीवे, शशीकला पारधी, श्री हनुमंतू डंबारे, इजाज शेख, सुरज बोरघरे, कु. रूचिता टोकलवार, कु. राणी गोंड, दर्शन मेश्राम, सिद्धांत निमसरकार, भैरव दिवसे, साहिल चौधरी, कु. शालीनी नितमलकर, कु. उर्वशी बोडपल्लीवार यांनी अथक परिश्रम घेतले.

दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ या दरम्यान घेण्यात आलेल्या महाविद्यालयीन विशेष शिबिराचा दैनिक कार्यक्रम असा होता.

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ०४.०० ते ७.३० | जागर, प्रार्थना, व्यायाम, योगासने |
| | ०७.३० ते ८.०० | अल्पोपहार, चहा |
| | ०८.०० ते ११.०० | श्रमसंस्कार |
| | ११.०० ते १२.०० | स्नान |
| दुपारी | १२.०० ते ०१.०० | भोजन |
| | ०१.०० ते २.०० | विश्रांती |
| | ०२.०० ते ०३.०० | दैनंदीन डायरी भरणे |
| | ०३.०० ते ०५.०० | बौद्धिक कार्यक्रम |
| | ०५.०० ते ०५.३० | खेळ |
| सायंकाळी | ०५.३० | प्रार्थना |
| | ०७.०० ते ९.३० | सांस्कृतिक कार्यक्रम |
| | ०९.३० | भोजन व विश्रांती |

## दि. 8 फेब्रुवारी 2023 मतदान जनजागृती अभियान

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर राष्ट्रीय सेवा योजना विभागद्वारा दि. ८ फेब्रुवारी २०२३ रोजी राष्ट्रीय मतदार दिन निमित्त मतदान माझा अधिकार या विषयावर आभासी व्याख्यान आयोजित करण्यात आले. मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांचा सहभाग वाढावा, नवीन मतदारांना नोंदणीसाठी प्रोत्साहन मिळावे व मतदारांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी या उद्‌देश्याने भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिवस

दि. २५ जानेवारी हा  देशभरात राष्ट्रीय मतदान दिवस म्हणून सन २०१९ पासून साजरा करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने सुजान व जबाबदार नागरिक घडविण्यासाठी महाविद्यालयमध्ये हा दिवस अनिवार्यपणे साजरा करण्यासंदर्भात शासनाने परिपत्रक काढले होते. त्याची अंमलबजावणी करण्यारिता सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने वेगवेगळया स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धेचा समावेश होता स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाला प्रमख अतिथी म्हणून डॉ. संजय ठाकरे, सहसंचालक उच्च शिक्षण विभाग, नागपूर यापुसंगी म्हणाले देशाला सक्षम बनवायचे असेल तर देशाचे खरे आधारस्तंभ असणाऱ्या तरूणांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला पाहिजे तसेच त्यांनी महाविद्यालयातील या स्तूत्य उपक्रमाला आपल्या शुभेच्छा दिल्या. तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. संजय गोरे, राज्यशास्त्र विभागप्रमुख शरदचंद्र पवार महाविद्यालय गडचांदूर आपल्या मार्गदर्शनात म्हणाले देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असतांना अजूनही अनेक युवकांनी आपली नोंदणी मतदार यादीत केलेली नाही याबददल खेद व्यक्त केला. देशातील नागरिक न्यायाची व कायदेयाची भाषा करतात परंतू आपल्या जबाबदारीची जाणीव त्यांना नाही. आजही मतदारंना जागृत करण्यासाठी शासनाला अनेक उपक्रम राबवावे लागतात ही गोष्ट भारताच्या लोकशाहीला शोभणारी नाही. भारताच्या बृद्धीमत्तेचा गौरव सर्व जगात होतो म्हणून शिक्षित वर्गानी मतदानात भाग घेवून योग्य उमेदवार निवडून भारतीय लोकशाही बळकट करावी असे आवाहन केले.

| (डॉ. कुलदीप आर. गोंड) | (डॉ. उषा खंडाळे) | (डॉ. प्रमोद एम. काटकर) |
|---|---|---|
| कार्यक्रम अधिकारी | कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य |

# Sardar Patel Mahavidyalaya, Chandrapur

## Department of National Service Scheme

### National level, State Level, University Level Camp Participation

### 2022-2023

| Sr. No. | Name of Volonteer | Level | Date | Place |
|---|---|---|---|---|
| 01 | Mr. Darshan D. Meshram | State | 13th Feb. to 19th Feb. 2023 | Arjuni Morgaon, Gondia |
| 02 | Ku. Shalini L. Nirmalkar | State | 13th Feb. to 19th Feb. 2023 | Arjuni Morgaon, Gondia |
| 03 | Mr. Siddhant R. Nimsarkar | Avhan | 19th Dec. to 28th Dec. 2022 | North Maharashatra University, Jalgaon |
| 04 | Mr. Sahil S. Chaudhari | Avhan | 19th Dec. to 28th Dec. 2022 | North Maharashatra University, Jalgaon |
| 05 | Ku. Urvashi Bodpalliwar | Avhan | 19th Dec. to 28th Dec. 2022 | North Maharashatra University, Jalgaon |
| 06 | Ku. Shalini L. Nirmalkar | Avhan | 19th Dec. to 28th Dec. 2022 | North Maharashatra University, Jalgaon |
| 07 | Ku. Samiksha R. Kurekar | Adventure | 2nd Nov. to 6th Nov. 2022 | Sant Gadgebaba Amravati Uni. Amravati |
| 08 | Mr. Siddhant R. Nimsarkar | NIC | 26th Feb. to 4th Feb. 2023 | RTM Nagpur University, Nagpur |

**(Dr. Kuldeep R. Gond)**
**Program Officer**

**(Dr. Usha Khandale)**
**Program Officer**

**(Dr. P. M. Katkar)**
**Principal**

## Sardar Patel Mahavidyalaya, Chandrapur
## Department of National Service Scheme
## National, State, College Level Camp Best Volunteer Participation
## 2022-2023



## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३







दि. २१ जून २०२२ रोजी जागतीक योग दिन निमित्य योग अभ्यास व मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर सोबत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३







दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ पर्यंत स्वच्छता पंधरवाडा अंर्तगत महाविद्यालयीन परिसर व वर्ग स्वच्छ करतांना रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३





दि. १० ऑगस्ट २०२२ रोजी हर घर तिरंगा अभियानात रासेयोचे स्वयंसेवक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना तिरंगा वाटप करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर सोबत कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदीप आर. गोंड






दि. १८ ऑगस्ट २०२२ रोजी वृक्ष रक्षाबंधन कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार, इको–प्रो संस्थाचे संस्थापक श्री बंडू धोत्रे सोबत रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३







दि. ११ सप्टेंबर २०२२ रोजी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महाविद्यालयीन परिसर स्वच्छ करतांना रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३






दि. २३ सप्टेंबर २०२२ रोजी स्व. शांतारामजी पोटदुखे यांच्या पुण्यस्मरणाप्रीत्यर्थ भव्य रक्तदान शिबिर व दंत चिकित्सा शिबिरात सर्वोदय शिक्षण मंडळाचे सचिव श्री प्रशांतभाऊ पोटदुखे, शासकीय रूग्णालयाचे चमू सोबत रासेयो कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३







दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस पर मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर सोबत कला विभाग प्रमुख डॉ. प्रकाश शेंडे, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३







दि. २ ऑक्टोबर २०२२ रोजी माता महाकाली स्वच्छता शांती यात्रेत सहभाग घेतांना रासेयोचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३





दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी संविधान दिन निमित्य भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला माल्यार्पन करून सामुहिकरित्या संविधान उद्देशिकाचे वाचन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर सोबत रासेयो कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, स्वयंसेवक व विद्यार्थी

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३







दि. १ डिसेंबर २०२२ रोजी शासकीय रूग्णालयात एडस रॅलीत सहभाग घेतांना रासेयोचे कार्यक्रम अधिकरी व स्वयंसेवक

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३






दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिराचे उद्घाटन करतांना सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. श्री सुदर्शन निमकर सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर, विसापूर ग्रामपंचायतचे उपसरपंच मा. श्री. अनेकश्वर मेश्राम, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार व कार्यक्रम अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३






## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३






## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३



दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिराचे उद्घाटन प्रसंगी ध्वजारोहन करतांना सर्वोदय शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. श्री सुदर्शन निमकर सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर, विसापूर ग्रामपंचायतचे उपसरपंच मा. श्री. अनेकश्वर मेश्राम, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवा, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी व शिबिरार्थी

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३




दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिरात विसापूर ग्रामवासियांना रॅलीद्वारे स्वच्छता आणि मतदान जनजागृती करतांना रासेयोचे कार्यक्रम अधिकरी व शिबिरार्थी




दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिरात कॅम्प फॉयरचा नियोजन करतांना रासेयोचे कार्यक्रम अधिकरी व शिबिरार्थी

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३







दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिरात आरोग्य शिबिरात मधुमेह, बी.पी., आर.बी.सी. व इतर वैद्यकीय चाचाणी करतांना वैद्यकीय अधिकारी डॉ अविशा मडावी

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३






दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिरात आरोग्य शिबिरात मधुमेह, बी.पी., आर.बी.सी. व इतर वैद्यकीय चाचणी करतांना वैद्यकीय अधिकारी डॉ अविशा मडावी

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३







दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिरात योग नृत्य करतांना रासेयोचे कार्यक्रम अधिकरी व शिबिरार्थी

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३







दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिरात विद्यापीठ आपल्या दारात सर्वेक्षण करतांना रासेयोचे स्वयंसेवकांना

राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२—२०२३






दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिरात विद्यापीठ आपल्या दारात सर्वेक्षण करीता स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदीप आर. गोंड

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३






दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिरात नाटक आणि नृत्य सादर करतांना स्वयंसेवक

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग २०२२–२०२३






दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२३ पर्यंत रासेयो महाविद्यालयीन विशेष शिबिराचे समारोपीय कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद एम. काटकर

प्रति,
मा. संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

विषय : सत्र २०२२—२०२३ चा वार्षिक अहवाल (विशेष शिबिर व नियमित कार्यक्रम) पाठविण्याबाबात.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सत्र २०२२—२०२३ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारा आयोजित विशेष शिबिर व नियमित कार्यक्रम चा वार्षिक अहवालाची एक प्रत, पेपरकटींग व फोटोसह आपल्या कार्यालयात पाठविण्यात येत आहे.

माहितीकरीता सादर.

आपला

(डॉ. प्रमोद एम. काटकर)
प्राचार्य